नि.फौ.ख.क्रमांक ३८२/२०२४. नि.क्र.१३

**- आरोपपत्र-**

मी, पी. एच. पाटील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२ तुमचेवर खालीलप्रमाणे आरोप ठेवतो की,

आरोपी क्र. **१. सुनिल विष्णु म्हसे**
वय- ४४ वर्षे, धंदा- मजुरी,
**२. सतिष विष्णु म्हसे**
वय- ३८ वर्षे, धंदा- मजुरी,
**३. सिध्दार्थ सुनिल म्हसे**
वय- १९ वर्षे, धंदा- मजुरी,
**४. विधी संर्घषीत बालक**
सर्व रा. शिलेगाव, ता.राहुरी,जि.अहमदनगर

**अ.** दिनांक १८.०५.२०२४ रोजी सायंकाळी ०६.३० वाजेच्या सुमारास मौजे शिलेगाव शिवारात, ता. राहुरी जि. अहमदनगर येथे तुम्ही संगनमताने आरोपी क्र.२ याने फिर्यादीच्या साडीचा पदर ओढला तसेच तुम्ही आरोपी क्र.१ याने फिर्यादीचा हात पिरगाळुन छातीवर बुक्कया मारून खाली पाडले व फिर्यादीस लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे **कलम ३५४ सहकलम ३४** अन्वये भा. दं. विधानाचे अंतर्गत गुन्हा केला.

**ब.** वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी तुम्ही संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारास शिवीगाळ व लाथाबुक्कयांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली आणि त्याद्वारे तुम्ही **कलम ३२३ सहकलम ३४** अन्वये भारतीय दंड विधानाचे अंतर्गत गुन्हा केला.

**क.** वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी तुम्ही संगनमताने फिर्यादी व साक्षीदाराचा अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्या मागचा उद्देश होता आणि त्याद्वारे तुम्ही **कलम ५०४ सहकलम ३४** अन्वये भारतीय दंड विधानाचे अंतर्गत गुन्हा केला.

**ड.** वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी तुम्ही संगनमताने फिर्यादी यांना दमदाटी करुन सर्वांना जेल मध्ये बसविण्याची धमकी देवून धाकदपटशा दाखविला आणि त्याद्वारे तुम्ही **कलम ५०६ सहकलम ३४** अन्वये भारतीय दंड विधानाचे अंतर्गत गुन्हा केला.

जे गुन्हे मी दाखल घेण्यास पात्र आहेत याद्वारे मी आदेश देत आहे की, आपणावरील कलमान्वये खटला चालविण्यात येत आहे.

PANKAJ HILAL PATIL Digitally signed by PANKAJ HILAL PATIL Date: 2025.09.16 11:30:32 +0530

राहुरी. **(पी. एच. पाटील )**
दिनांकः ०८/०८/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२, राहुरी

वर नमुद केलेला तपशील आरोपीला वाचुन दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला व वर नमुद केलेला गुन्हा त्याने कबुल नसल्याचे सांगितले आहे.

PANKAJ HILAL PATIL Digitally signed by PANKAJ HILAL PATIL Date: 2025.09.16 11:30:37 +0530

राहुरी. **( पी. एच. पाटील )**
दिनांकः ०८/०८/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२, राहुरी